847350/2023/AO_1

I/139131/2023

JDPNE-SCH10SCHL(1)/3/2023-ADM_1


# महाराष्ट्र शासन

## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी पोर्टल-२०२३-२४/(८४७३५०/२३)/शिष्यवृत्ती/ दिनांक : १०.१०.२०२३

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - शिष्यवृत्ती योजनांची सन २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे विविध अभ्यासक्रमनिहाय विविध शुल्क यांबाबतची माहिती आणि प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२३-२४/डीबीटी/फी मंजूरी दि. ०५.१०.२०२३.

उपरोक्त विषयाबाबत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांचे महाविद्यालय/विद्यापीठ/संस्था यांचे महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

महाडीबीटी पोर्टलवर सर्व महाविद्यालयांनी/विद्यापीठांनी/संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता त्यांचे प्रोफाईल पुढीलप्रमाणे अद्ययावत करुन घ्यावे. १. महाविद्यालयासाठी नवीन अभ्यासक्रम मंजूर झाला असल्यास त्या नवीन अभ्यासक्रमाची नोंद महाडीबीटी पोर्टलवर महाविद्यालयाच्या लॉगीनवर करणे. २. महाविद्यालयाचे क्लर्क आणि प्रिंसिपल यांची माहिती (आधार क्र., मोबाईल क्र., ईमेल आयडी, नवीन नियुक्ती) अद्ययावत करणे. ३. महाविद्यालयाचे शिष्यवृत्ती करीता नवीन बँक खाते केले असल्यास खात्याची माहिती अद्ययावत करणे. ४. महाविद्यालयाचे अभ्यासक्रमनिहाय शुल्काची नोंद करणे. (संलग्नित विद्यापीठाचे फी स्ट्रक्चर २०२३-२४ नुसार).

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता जे शैक्षणिक शुल्क आकारणी केले आहे. त्याबाबतचे अभ्यासक्रमनिहाय तसेच बाबनिहाय माहिती सर्व विद्यापीठांकडून प्राप्त झाल्यानंतर ते या कार्यालयाकडून परिपत्रकाद्वारे संकेतस्थळावर

पाठविण्यात येईल. तसेच सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे फी स्ट्रक्चर बाबतचे परिपत्रक निर्गमित करण्या अगोदर महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये फी डिटेल्स टॅबवर कोणत्याही चुकीच्या रक्कमा अथवा मागील वर्षांच्या रक्कमा भरुन फी ॲप्रवुल पाठवू नयेत. जे महाविद्यालय चुकीच्या रक्कमा अथवा मागील वर्षांच्या रक्कमा भरुन फी ॲप्रुवलसाठी पाठवतील अशा महाविद्यालयांच्या फी ॲप्रुवल संबंधित कोणत्याही समस्या आल्यास त्याकरीता संबंधित महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ जबाबदार राहतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तरी सर्व महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी / संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता त्यांचे प्रोफाईल महाडीबीटी पोर्टलवर तातडीने अद्ययावत करावे.

Signed by
Kirankumar Laxmanrao Bondar
Date: 12-10-2023 18:03:48

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे